**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला थोड्याच वेळात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार

- पोलीस, सीबीआय, अग्निशमन, होमगार्ड वगैरेतल्या १ हजार ५७ जणांचा शौर्य आणि सेवा पदकांनी गौरव, राज्यातल्या ८२ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश

- यंदाच्या जनगणनेत नागरिकांना ‘जात’ विचारली जाणार, सरकारकडून प्रश्नांची अधिसूचना जारी

**<u>आणि</u>**

- स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याप्रकरणी राहुल गांधी यांच्याविरोधातला मानहानीचा खटला सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार आहेत. आज संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. राष्ट्रपतींच्या या संदेशाचा मराठी अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयानं पोलीस दल, अग्निशमन सेवा, होम गार्ड्स, नागरी संरक्षण आणि कारागृह सेवा विभागातल्या एकूण ‘एक हजार ५७ कर्मचाऱ्यांना’ शौर्य आणि सेवा पदकं जाहीर केली आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज एकूण ३०१ शौर्य पदकांची यादी जाहीर केली यात पोलीस दलातल्या २७२ पोलीस कर्मचारी आणि अग्निशमन सेवा विभागातल्या २९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. जीव आणि मालमत्तेचं रक्षण करणं, गुन्हे रोखणं किंवा गुन्हेगारांना पकडणं यासाठी उल्लेखनीय धैर्य दाखवल्याबद्दल शौर्य पदक दिलं जातं. तसंच एकूण ९२ राष्ट्रपती पदकं जाहीर करण्यात आली असून यामध्ये पोलीस सेवेसाठी ८३, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेसाठी ३ आणि सुधार सेवा विभागासाठी २ पदकांचा समावेश आहे. यासह ‘उत्कृष्ट सेवेसाठी’ एकूण ६६४ जणांना पदकं

जाहीर करण्यात आली असून यात पोलीस दलातल्या सेवेसाठी ६०६, अग्निशमन सेवेसाठी २८, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेतल्या १८ आणि सुधार सेवा विभागातल्या १२ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

पदकविजेत्यांमध्ये राज्यातल्या ८२ जणांचा समावेश आहे. त्यात तिघांना पोलीस सेवेसाठी राष्ट्रपती पदक, कारागृह सेवेतल्या दोघांना राष्ट्रपती पदक, २० जणांना पोलीस शौर्य पदक, १३ जणांना अग्निशमन शौर्य पदक, ३७ जणांना उत्कृष्ट सेवेसाठी पोलीस सेवा पदक, २ जणांना अग्निशमन सेवा पदक, होमगार्डमधल्या तिघांना आणि कारागृह सेवेतल्या दोघांना हे पदक जाहीर झालं आहे.

**<><><><><>**

८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी लाल किल्ल्यावर ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर ते देशाला उद्देशून संबोधन करतील. या विषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

- **- व्हाइस कास्ट - - -**

*(देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी देशभरात जय्यत तयारी सुरू आहे. देशाचा मुख्य कार्यक्रम लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होईल. यावेळी ध्वजारोहणासाठी कॅप्टन सोनिया सिंग चौहान प्रधानमंत्र्यांना सहाय्य करतील. त्यानंतर २१ तोफांची सलामी दिली जाईल. यावर्षी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावर वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचं गायन होईल. त्यानंतर राष्ट्रगीत गायलं जाईल. भारतीय सैन्यदलातले जवान, माय भारतचे स्वयंसेवक यासह मुले-मुली मिळून एकूण अडीच हजार जण यावेळी उपस्थित असतील. याशिवाय प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी योजनेचे लाभार्थी, भारत टॅक्सीचे चालक असे ५ हजार विशेष पाहुणे यासाठी विशेष निमंत्रित आहेत.*

*संध्याकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती भवनात स्वागत समारंभाचं आयोजन करणार आहेत. यासाठीच्या निमंत्रण पत्रिकेत वारली चित्रकलेचा समावेश आहे. या समारंभात लावणी नृत्य, सोंगी मुखवटे सादर केले जाणार आहेत. याशिवाय गोंधळ, जागरण, वाघ्या मुरळी परंपरेतले लोक कलाकार यात सहभागी होणार आहेत. या पाहुण्यांसाठी आयोजित*

*मेजवानीच्या टेबलावर खण ठेवला जाणार आहे. तर खाद्य पदार्थांमध्ये वडा पाव, पातोळे यांच्या समावेश आहे.)*

<><><><><>

**श्रोते हो,** लालकिल्ल्यावरुन होणाऱ्या या समारंभांचे थेट प्रक्षेपण सकाळी ७ वाजेपासून आपल्याला आकाशवाणीवरुन ऐकता येईल. त्यामुळं सकाळच्या प्रादेशिक बातम्या ६ वाजून ४० मिनिटांनी प्रसारित होती.

<><><><><>

स्वातंत्र्य दिनानिमित्त उद्या मंत्रालयात सकाळी ९ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. तर पुण्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.

<><><><><>

सध्या सुरू असलेल्या जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी अधिसूचनेद्वारे देशाचे 'जनगणना आयुक्त आणि महा रजिस्ट्रार' यांनी आज राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. त्यात नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी केवळ अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध होता.

गेल्या वेळेच्या जनगणनेत एकूण २९ प्रश्न नागरिकांना विचारले गेले होते, यावेळी ही संख्या ४० झाली आहे.जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही माहिती नागरिकांना विचारली जाईल. यात यंदा कोविड लस घेतल्याचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाईल, आधार, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आणि वाहन परवाना याचीही माहिती विचारली आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंदर्भात केलेल्या मानहानीकारक वक्तव्यांप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल झालेला खटला सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केला. या प्रकरणात आवश्यक असलेली कायदेशीर मंजुरी घेतली नसल्याचं सांगत न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या पीठाने हे आदेश दिले.

<><><><><>

गेल्यावर्षी प्रमाणे यंदाही ६ फुटापेक्षा अधिक उंचीच्या गणेश मुर्तींचं विसर्जन समुद्र, नदी, तलाव यासारख्या नैसर्गिक जलस्रोतांमध्ये करायला मुंबई उच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. त्यापेक्षा कमी उंचीच्या मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित कराव्या लागतील. याप्रकरणी न्यायालयानं निकाल राखून ठेवला आहे.

**<><><><>**

जालना ही सिल्क, स्टील आणि सीड सिटी झाली असून रेशीम उत्पादनातून एक मोठी अर्थव्यवस्था उदयाला येत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. ते आज जालना इथे राज्यातल्या पहिल्या रेशीम कोष बाजारपेठ इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी बोलत होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन आणि कापूस यांसारख्या पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेतीसारखा फायदेशीर पर्याय स्वीकारण्याचं आवाहन केलं.

**<><><><>**

गेल्या ५ वर्षात राज्यातल्या ३६ हजाराहून अधिक कंपन्या बंद झाल्याचं लोकसभेतल्या एका उत्तरात स्पष्ट झालं होतं. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. बंद झालेल्यांपैकी ७६ टक्के कंपन्या कधीच सुरू झालेल्या नव्हत्या . एकत्रीकरणामुळं १२ टक्के तर विसर्जित झाल्यामुळं २ टक्के कंपन्या बंद झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलंय. नव्या कंपन्यांच्या नोंदणीत दरवर्षी महाराष्ट्र पुढे असतो. गेल्या वर्षी राज्यातल्या साडे ४१ हजार नव्या कंपन्यांची नोंद झाली असंही ते म्हणाले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी चाकण MIDC मधल्या समस्यांकडे लक्ष वेधले होते. या समस्या मान्य करत उद्योग मंत्री उदय सामंत यांना त्याकडे लक्ष द्यायला सांगितल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. याप्रकरणी परवाच संबंधित यंत्रणांची एक बैठक झाली असून समाधान काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा निश्चित केल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

ज्येष्ठ कवी दत्तात्रेय भास्कर धामणस्कर यांचं आज सकाळी डोंबिवली इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. 'प्राक्तनाचे संदर्भ', 'बरेच काही उगवून आलेले' आणि 'भरून आलेले आकाश' यांसारख्या दर्जेदार कवितासंग्रहांच्या माध्यमातून मराठी काव्यविश्वात आपल्या चिंतनशील आशयाचं गारुड त्यांनी निर्माण केलं होतं. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी धामणस्कर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोलीमध्ये जपतलाई इथल्या आश्रमशाळेच्या वसतीगृहात सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींच्या मृत्यु प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणात राज्याच्या मुख्य सचिवांना आयोगानं नोटीस बजावली असून दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावरच्या प्रलंबित कामांचा आढावा घेण्यापेक्षा कामांना प्रत्यक्ष वेग देण्यात यावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले आहेत.

**//<><><><><>//**